# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत आणि जीवन
- कवी / कवयित्रीचे नाव :- प्रभाकर फडके

संगीताचे जीवनातले स्थान शोधता नवल घडे
जीवन सर्वच लोपुन जाउन दृष्टीला संगीत पडे
संस्कृतमध्ये संगीतामधि गीत, वाद्य, नृत्य असे
जीवनात परी नृत्य वेगळे संगीतापासून दिसे
बाळ जन्मले आणि न रडले असे कधीही ना होई
बाळाचे रडणेहि ऐकण्या होत असे सर्वा घाई
बाळ जरा मोठे होता ते दुडूदुडू धावत येत असे
पावलात त्या संगीताचे अल्प गोडसे रूप दिसे
झोप येईना जरि बाळाला अंगाई गीता गाणे
आईच्या ओठातुन येई संगीतध्वनि  मंदपणे
अआइई शिकण्या जेव्हा शाळेला बाळे जाती
सुरुवातीचे धडे सर्वही कविता रुपात असती
गीतांच्या जोडीने आता वाद्य येती साथीला
सर्वहि वाद्यांना लागतसे अवश्य साथीला तबला
मुंज असो वा लग्न त्यामध्ये मंगलाष्टके म्हणताती
सनई त्यांना साथ देतसे बसूनीया दारावरती
मिरवणूक मुंजीची अथवा होवो नवरी नवऱ्याची
बँडपथक ते पुढे राहुनी साथ देत त्या वाद्यांची
डोहाळे लागता जमुनिया सर्वजणी गीते गाती
झोपाळ्यावर बसवुन तिजला साऱ्या फिरती तिजभवती
बाळ जन्मल्यानंतर त्याचे नाव ठेवण्याला जमती
थाटाने बारसे कराया खूप पाळणा सजवीती
काहि घरामधि मृत्यू होता तेथ रुदाल्या रडताती
खांद्यावरती प्रेता घेता श्रीराम जयराम जय म्हणती
जन्मापासूनि अशा प्रकारे साथ असे संगीताची
जीवन आणिक संगीताची जोडी दिसते कायमची

Anand Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

वेदहि जेव्हा स्फुरले ऋषिना ऋचा तदा जन्मा आल्या
ऋग्वेदा संगीत देऊनी सामवेदही निर्मियला
रामायणि अन महाभारती महाकाव्य दृष्टीस पडे
महाभारती भगवद्गीतेचे दर्शनही नित्य घडे
उत्सव करिती उत्साहाने वेगवेगळे जरि सारे
संगीताची साथ न घेता कधी न होती तेहि पुरे
सव्वीस जानेवारीला तसा पंधरा ऑगस्टला
राष्ट्रोत्सव करण्यास साजरा पूर्ण देशची सरसरला
दोन्ही दिवशी जगास भारत अपुली शक्ति दाखविती
तिन्ही दलांना शस्त्रास्त्रासह मानवंदने उतरविती
वाद्यपथक प्रत्येक दलाचे राहुन सर्वांच्या पुढती
विविध अशा वाद्यातुन सुस्वर राष्ट्रगीत सादर करिती
संगीताच्या उपचाराने करण्यासाठी रुग्ण बरे
विविध राग ऐकवून त्यांना, दिसे आज होतसे खरे
पोटामधल्या बाळालाही विशिष्ट रागा ऐकवुनी
जगात येण्याआधीच त्याला सज्ज ठेविती बनवोनी
आता सांगा संगीताचे काय जीवनी स्थान असे
काढा संगीत जीवनातुन शून्य उरे हे सत्य दिसे

Anahat Music Therapy